# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 23/08/2023 (बुधवार) सकाळ


## जिवानीशी ठार करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पो.स्टे. मौदा** :— अंतर्गत २० कि. मी अंतरावरील मौजा नवकार लॉजिस्टीक महालगाव शिवार येथे दिनांक १९/०८/२०२३ चे २१.०० वा. ते दिनांक २०/०८/२०२३ चे ०५.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— श्री. संतोश दिनानाथ निमजे, वय ६३ वर्ष, रा. प्लॉट नं. बी ३३५, धम्मदीप नगर पोस्टे यशोधरा नगर नागपूर शहर यांची मतिमंद मुलगी नामे — कुमारी गिता संतोश दिनानाथ निमजे, वय ३३ वर्ष, रा. प्लॉट नं. बी ३३५, धम्मदीप नगर नागपूर ही दिनांक १९/०८/२०२३ चे रात्री २१/०० वा. ते दिनांक २०/०८/२०२३ चे सकाळी ०५/०० वा. दरम्यान नागपूर ते भंडारा रोडवर महालगाव शिवारात पोस्टे मौदा हद्दीत ती मतिमंद असल्याचा कोणीतरी अज्ञात व्यक्तीने तिचा खुन करण्याच्या उद्देशाने गैरफायदा घेवून तिचे डोक्यावर इजा पोहोचवली असता ती महामार्ग क्र. ५३ वर असलेल्या नौकरकार कंपनी महालगाव शिवारचे एन्ट्री गेटवर असलेल्या गार्ड रूममध्ये बेशुदध अवस्थेत मिळून आल्याने उपचारकामी मेओ हॉस्पीटल नागपूर येथे भरती केले असता उपचारादरम्यान दि. २१/०८/२०२३ चे अंदाजे २०/३० वा. डॉक्टरांनी तपासुन मृत घोषित केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३०२ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक किशोर नगराळे मो. क्र. ९८२३१४५९४७ हे करीत आहे.

## घरफोडी

**पो.स्टे. उमरेड** :— अंतर्गत क्रिष्णाजी रेहपाडे, यांचे घरी रहाटे ले आउट येथे दिनांक २१/०८/२०२३ चे रात्री २२.०० वा. ते दिनांक २२/०८/२०२३ चे सकाळी १०.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— प्रविन महादेवराव शास्त्रकार, वय ३५ वर्ष रा. क्रिष्णाजी रेहपाडे यांचे घरी रहाटे ले आउट यातील फिर्यादी हे नागपंचमी सणानिमीत्याने मुळ गावी सिर्सी येथे गेले असता रात्री तिथेच थांबले दि. २२/०८/२०२३ चे सकाळी १०/०० वा. गावावरून परत उमरेडला आले असता त्यावेळेस घरात प्रवेश करण्याचा अगोदर घरातील लाकडी दरवाजाच्या हॅडल तुटलेला दिसला घरातील हॉलमध्ये लावलेली एल. ई. डी ४३ इंच किंमती २००००/—रू. सोकेस मध्ये दिसली नाही व लोखंडी आलमारी लॉक तोडुन नगदी ३५०००/—रू अशा एकुण ५५०००/— रूपयाचा मुद्देमाल अज्ञात चोराने घरात प्रवेश करून चोरी करून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक प्रमोद घोंगे मो. नं. ९९२३३७४२९० हे करीत आहे.


पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर